श्री.राजेश क्षीरसागर, "कार्यकारी अध्यक्ष, राज्य नियोजन मंडळ" यांना "मंत्री दर्जा" असल्याने सुविधा पुरविण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

नियोजन विभाग

शासन निर्णय क्रमांक : रानिमं-२०१९/प्र.क्र.७२/का-१४२६,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दिनांक : २६ जून, २०१९.

वाचा : नियोजन विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१९/प्र.क्र.६९/का-१४२६, दिनांक १७ जून, २०१९.

प्रस्तावना -

नियोजन विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१९/प्र.क्र.६९/का-१४२६, दिनांक १७ जून, २०१९ अन्वये श्री.राजेश क्षीरसागर यांची "कार्यकारी अध्यक्ष, राज्य नियोजन मंडळ" या पदावर नियुक्ती करण्यात आली असून त्यांना "मंत्री दर्जा" देण्यात आला आहे. "कार्यकारी अध्यक्ष, राज्य नियोजन मंडळ" यांना मंत्री दर्जासाठी असलेल्या सुविधा द्यावयाची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार शासनाने पुढील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय :-

श्री. राजेश क्षीरसागर, "कार्यकारी अध्यक्ष, राज्य नियोजन मंडळ" यांना "मंत्री दर्जा" देण्यात आल्याने खालील सुविधा अनुज्ञेय राहतील :-

१) राज्य नियोजन मंडळाकरीता कार्यालय.
२) मुंबईत नि:शुल्क निवासस्थान.
३) राज्य नियोजन मंडळाच्या कामकाजासाठी शासकीय वाहन.
४) राज्य नियोजन मंडळासाठी कार्यालयीन दूरध्वनी व निवासी दूरध्वनी.
५) राज्य नियोजन मंडळाच्या आकृतीबंधानुसार वैयक्तिक व कार्यालयीन कर्मचारीवृंद.
६) महाराष्ट्र मंत्री वेतन व भत्ते अधिनियम-१९५६ व त्यामधील सुधारणांनुसार मंत्री पदासाठी देण्यात येणारे वेतन, दैनिक व बैठक भत्ता, वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती.
७) महाराष्ट्र मंत्री यांचे भत्ते नियम-१९७७ व त्यामधील सुधारणांनुसार मंत्री पदासाठी देण्यात येणारे प्रवास भत्ते.

२. श्री.राजेश क्षीरसागर, "कार्यकारी अध्यक्ष, राज्य नियोजन मंडळ" (मंत्री दर्जा) यांना वरील सवलती शासन मान्यतेने एक "खास बाब" म्हणून मंजूर करण्यात येत आहेत.

३. श्री.राजेश क्षीरसागर, "कार्यकारी अध्यक्ष, राज्य नियोजन मंडळ" (मंत्री दर्जा) यांचे वेतन, भत्ते, प्रवास भत्ता व अन्य देयकांसाठी कार्यासन अधिकारी, (कार्यासन-१४२२) (रोख शाखा), नियोजन विभाग यांना "आहरण व संवितरण अधिकारी" म्हणून व उप सचिव (आस्थापना), नियोजन विभाग यांना "नियंत्रक अधिकारी" म्हणून प्रतिस्वाक्षरी करण्यास प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. श्री.राजेश क्षीरसागर, "कार्यकारी अध्यक्ष, राज्य नियोजन मंडळ" यांना "मंत्री दर्जा" असल्याने सुविधा उपलब्ध करुन देण्याकरीता होणारा खर्च "मागणी क्र. ओ-७, ३४५१, सचिवालय आर्थिक सेवा, १०१, नियोजन आयोग/नियोजन मंडळ (०१) नियोजन आयोग मंडळ, (०१)(०१) राज्य नियोजन मंडळ (अनिवार्य) (३४५१०२०६)" या लेखाशिर्षाखाली त्या-त्या वर्षाच्या मंजूर तरतूदीतून भागविण्यात यावा.

५. वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक २२०/२०१९/व्यय-८ दिनांक २५ जून, २०१९ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीने सदर शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहेत.

६. महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर सदर शासन निर्णय उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०६२६१६३१२६५९१६ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Maya Roop Vasudeo

Digitally signed by Maya Roop Vasudeo
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Planning Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6feaef8191e4a5cf83f3409f76214c1bbb386df214f40eb3db528e6ea18a3bb1, serialNumber=60b30444f3b7ad81b2f32912506b69de2a01b84759943289c5b29755e4712c40, cn=Maya Roop Vasudeo
Date: 2019.06.26 16:37:15 +05'30'

(मा.रु.वासुदेव)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव
२) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव
३) मा.मंत्री (सर्व)
४) मा.श्री.राजेश क्षीरसागर, कार्यकारी अध्यक्ष, राज्य नियोजन मंडळ, मुंबई
५) अध्यक्ष, विदर्भ विकास मंडळ, नागपूर/मराठवाडा विकास मंडळ, औरंगाबाद/उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळ, मुंबई
६) मा.विरोधी पक्ष नेता विधानपरिषद/विधानसभा यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
७) मा.राज्यमंत्री (सर्व)

८) सर्व सन्माननीय विधानसभा, विधान परिषद व संसद सदस्य
९) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य
१०) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
११) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई
१२) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा) महाराष्ट्र-२, नागपूर
१३) सर्व विभागीय आयुक्त
१४) सर्व जिल्हाधिकारी
१५) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१६) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१७) नियोजन विभागातील सर्व सह/उप सचिव, अवर सचिव, कार्यासन अधिकारी
१८) कार्यासन १४२१ (आस्थापना), नियोजन विभाग, मंत्रालय
१९) कार्यासन १४२२ (रोख शाखा), नियोजन विभाग, मंत्रालय
२०) कार्यासन १४२३ (नोंदणी शाखा), नियोजन विभाग, मंत्रालय
२१) निवडनस्ती-का-१४२६, नियोजन विभाग